नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 06/03/2024 (बुधवार) सायंकाळ

---

## रामटेक हद्दीत अवैध दारू भट्टीवर छापा नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दि. ०५/०३/२०२४ रोजी पोलीस स्टेशन रामटेक येथील स्टाफ पोलीस स्टेशन रामटेक हद्दीतील मनसर शिवार येथे पेट्रोलिंग करीत असताना मुखबिरव्दारे महिती मिळाली की, होन्डा शाईन गाडी क्रमांक एम. एच.— ४०/सी एल ९६०५ ने मोहाफुल गावठी दारूची अवैध वाहतूक होत आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून एम. एच. — ४०/सी एल ९६०५ ने एका रबरी टयुब मध्ये अवैद्यरित्या दारू वाहतूक करणारा **आरोपी नामे— अजय जयराम कुंमरे, वय २४ वर्षे, रा. वानेरा, ता पारशिवनी** यांच्या ताब्यातून विनापरवाना व अवैधरीत्या १) होन्डा साईन गाडी क्रमांक— एम एच ४०/सी एल ९६०५ किंमती ५५,०००/—रुपये २) एक रबरी ट्युबमध्ये ४० लीटर मोहाफुल गावठी दारु किंमती ५०/— रुपये लीटर प्रमाणे किंमती २०००/रुपये असा एकुण— ५७,०००/—रुपयाचा मुद्देमाल मिळून आला. पो.स्टे. रामटेक येथे आरोपींविरुध्द कलम ६५ (अ), (ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

दि. ०५/०३/२०२४ रोजी पो.स्टे रामटेक हद्दीतील कांद्री माईन तलाव येथे दारूभट्टीवर रेड केली असता **आरोपी नामे**— **राजु किशोरी प्रजापती वय ४२ वर्षे, रा. कांद्री माईन ता. रामटेक** हा चुलीवरती ड्रम व त्यावरती घमेले ठेवुन मोहाफुलाची गावठी दारू गाळतांनी मिळुन आल्याने आरोपीचे ताब्यातून १) मोहाफुल हातभट्टी साहीत्य ड्रम किंमती ५००/—रु २) जर्मन घमेला किंमती १०००/—रु. ३) गरम मोहाफुल रसायन ४० कीलो ५०/रुपये कीलो प्रमाणे किंमती २०००/—रु ४) १० चुंगळी मधील मोहाफुल थंड रसायन प्रत्येकी १० कीलो प्रमाणे १०० किलो एकुण किंमती ५,०००/— रुपये ५) साचा किंमती —१००/रुपये ६) नळी, नेवार पट्टी व डबकी किंमती १००/रुपये, ७) रबरी टयुब मध्ये ४० लीटर मोहाफुल दारु कींमती ५०/— रुपये लीटर प्रमाणे किंमती २०००/— रुपये, ८) काड्या १० मन किंमती १००/— रुपये मनाप्रमाणे १०००/— रुपये असा एकुण ११,७००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपी विरुद्ध पो.स्टे रामटेंक येथे कलम ६५ (एफ) (सी) महाराष्ट्र दारुबंदी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोस्टे रामटेक येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक प्रशांत काळे, सहायक फौजदार संजय पायक, पोशि रूपेश राठोड, रामप्रसाद भलावी यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# नागपूर ग्रामीण पोलीसांची मोहाफुल दारू भट्टीवर धडक कार्यवाही

दिनांक ०६/०३/२०२४ वेळ १०.३० वा. ते ११.१५ वा. रोजी सहायक पोलीस निरीक्षक राजेश पाटील यांच्या मार्गदर्शनात पोलीस नायक प्रमोद मडावी, शिवा नागपुरे, पोलीस अंमलदार क्रांतीचंद हराळ, मनिश चौकसे, विष्णु लहाने केशव फड असे दारूबंदी बाबत पोस्टे परीसरात पेट्रोलींग करीत असतांना गोपनिय बातमीदाराकडुन विश्वसनिय माहिती मिळाली की, मौजा: चौरबाहुली जंगल परीसरात नाल्यालगत एक इसम मोहाफुल गावठी दारूची हातभट्टी अवैधरित्या काढत आहे. अशा मिळालेल्या खबरेवरून सदर ठिकाणी जावुन रेड केली असता त्या ठिकाणी १) प्रत्येकी ५० लिटर प्रमाणे एकुण ०९ प्लास्टीक ड्रम मध्ये एकुण ४५० लिटर रसायन सडवा किमंती २०/—रू. लिटर प्रमाणे एकुण ९०००/— रू २) दोन रबरी टयुब मध्ये ३० लिटर प्रमाणे ६० लिटर मोहाफुल गावठी दारू किंमती प्रति ५०/— रू प्रमाणे एकुण ३०००/—रू. ३) ०९ प्लास्टीक ड्रम, ०२ केटली दारू गाळण्याचे इतर साहीत्य किमंत ६०००/—रू अशा एकुण १८०००/— रू चा मुददेमाल जप्त करण्यात आला व आरोपी नामे. राकेश उर्फ गौरव अशोक कोडवते वय २३ वर्ष रा. चौरबाहुली ता. रामटेक जि. नागपुर यांचे विरुध्द पोस्टे ला अप. क्र. ६३/२४ कलम ६५ (ई), एफ, सि मदाका. प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर कार्यवाही श्री. हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नाग्रा, श्री. रमेश धुमाळ, अपर पोलीस अधिक्षक नाग्रा, व श्री. रमेश बरकते, सहा. पोलीस अधिक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक राजेश पाटील ठाणेदार पोलीस स्टेशन देवलापार यांचे पथक पोलीस नायक प्रमोद मडावी, शिवा नागपुरे, पोलीस अंमलदार कांतीचंद हराळ, मनिश चौकसे, विष्णु लहाने, केशव फड यांनी केली असून पुढील तपास पोलीस हवालदार अमर झिने करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**